| MHKO070010632016 | रे.क.नं.१९९/२०१६ | सौ.शांताबाई सुरेश चौगुले<br>वि.<br>बापुसो जिनदत्त सुर्यवंशी वगैरे ४ |
|---|---|---|

**निशाणी क्र.३९ खालील आदेश.**

**( पारीत ०९ डिसेंबर, २०२४ )**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी नं.३ यांनी त्यांच्याविरुध्द झालेला एकतर्फाचा आदेश रद्द करणेसाठी केला आहे. वादीतर्फे वकीलांनी सदर अर्जावरच त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्ज नामंजूर करणेविषयी विनंती केली आहे.

**०२.** प्रतिवादी नं.३ यांनी त्यांचे अर्जात असे कथन केले आहे की, वादी यांनी त्यांचेविरुध्द वाटपाचा व कायम मनाईचा दावा दाखल केलेला आहे. सदर दावेकामी प्रतिवादी नं.३ यांना दि.२.२.२०१८ रोजी समन्स लागू झाले आहे. प्रतिवादी नं.१ व २ हे सदर दावेकामी प्रतिवादी नं.३ च्या अगोदर हजर झाले आहेत. प्रतिवादी नं.१ हे कुटुंब प्रमुख असल्याने त्यांच्या मार्गदर्शनानुसार प्रतिवादी नं.३ हे वागत होते. त्यामुळे प्रतिवादी नं.३ यांना सदर दावेकामी स्वतंत्र कैफियत द्यावी लागते याची माहिती नव्हती. प्रतिवदी नं.१ व २ यांनी दिलेली कैफियत दावेकामी प्रतिवादी नं.३ यांची कैफियत म्हणून वाचली जाईल या गैरसमजुतीखाली प्रतिवादी नं.३ हे राहिले. त्यामुळे प्रतिवादी नं.३ यांचेविरुध्द एकतर्फा हुकूम झालेला आहे. प्रतिवादी नं.३ यांना दावेकामी त्यांची कैफियत नाही व त्यांचेविरुध्द एकतर्फा आदेश झाल्याचे समजल्याने तो आदेश रद्द करणेकरीता सदरचा अर्ज त्यांनी केला आहे.

**०३.** प्रतिवादी नं.३ यांनी पुढे असे कथन केले आहे की, प्रतिवादी नं.३ यांनी जाणीवपुर्वक हजर राहण्याचे टाळलेले नाही. केवळ प्रतिवादी नं.१ यांच्याकडे सर्व जबाबदारी असल्याने प्रतिवादी नं.१ यांनी कैफियत दिली आहे म्हणजे ती सर्वांच्या वतीने आहे या गैरसमजुतीखाली प्रतिवादी नं.३ राहिले. सदर दावेकामी प्रतिवादी नं.३ यांना प्रतिवादी नं.१ व २ यांनी दिलेल्या कैफियतीप्रमाणेच कैफियत

देणेची आहे. प्रतिवादी नं.१ व २ यांच्या कैफियतीमधील मजकुरा व्यतिरिक्त जादा कोणताही मजकुर प्रतिवादी नं.३ यांना मे.कोर्टासमोर मांडणेचा नाही. त्यामुळे त्यांची स्वतंत्र केस मे.कोर्टासमोर येणार नाही. त्यामुळे जादा मुद्दे काढणेचा प्रसंगही उद्भवणार नाही. त्यामुळे काम लांबणार नसून ज्या टप्प्यावर काम आजरोजी चालू आहे त्याच टप्प्यावर पुढील काम सुरु होणार आहे. त्यामुळे वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच काम चालणेस देखील विलंब होणार नाही. प्रतिवादी नं.३ यांची कैफियत रेकॉर्डवर घेतलेस व एकतर्फा आदेश रद्द झालेस वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट प्रतिवादी नं.३ यांना दावेकामी सामील करुन घेतलेस दावा गुणदोषावर चालणेस मदतच होणार आहे. सबब, प्रतिवादी नं.३ यांचेविरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्दबातल करुन प्रतिवादी नं.३ यांना दावेकामी हजर करुन घेवुन त्यांची कैफियत रेकॉर्डवर घेणेविषयी विनंती प्रतिवादी नं.३ यांनी केली आहे.

**०४.** वादीतर्फे वकीलांनी सदर अर्जावरच त्यांचे म्हणणे देवून असे कथन केले आहे की, प्रतिवादी नं.३ यांना दि.२/२/२०१८ रोजी दावेचे समन्स लागु आहे. आजपावेतो सदरकामी कैफियत देणेची तसदी घेतलेली नाही. प्रतिवादी क्र.३ विरुध्द एकतर्फा आदेश दि.१०/१२/२०१९ ला झालेला आहे. इतक्या दिवस विलंब का झाला त्याचा हिशोब नाही. मोघम दिलेला अर्ज मंजूर करता येणार नाही. जाणीवपुर्वक प्रकरण लांबवणेच्या दृष्टीने दिलेला अर्ज आहे तो रक्कम रु.५०००/– कॉस्ट करुन नामंजूर करणेविषयी विनंती वादी यांनी केली आहे.

**०५.** उभयपक्षाच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. सदर दावा हा वादी यांनी यातील प्रतिवादी यांचेविरुध्द वाटपासाठी व कायम मनाईसाठी दाखल केलला आहे. सदर कामातील प्रतिवादी नं.३ हे समन्सची बजावणी होवून देखील सदर कामात हजर नसलेमुळे त्यांचेविरुध्द दि.१०.१२.२०१९ रोजी एकतर्फा चा आदेश झालेला आहे. अर्जात नमुद केलेले कारण हे जरी संयुक्तीक वाटत नसले तरी प्रस्तुतचे प्रकरण हे उभयपक्षातील वादाचे संपूर्ण निराकरण करण्यासाठी व प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढण्याच्या उद्देशाने प्रतिवादीस संधी देणे विधीसंगत वाटते. परंतु, संधी देताना त्यांनी घेतलेल्या वेळेच्या अनुषंगाने वादीला खर्च देणे देखील गरजेचे आहे. करिता खालील आदेश पारीत करण्यात येतो–

**– <u>आदेश</u> –**

१. प्रस्तुतचा अर्ज (निशाणी क्र.३९) प्रतिवादी यांनी खर्च म्हणून वादी यांना र.रू.५५०/– (र.रु.पाचशे पन्नास फक्त) भरण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.३ यांचे विरुध्दचा दि.१०.१२.२०१९ रोजी नि.क्र.१ वर झालेला ''एकतर्फा'' चा आदेश खर्चाची पुर्तता झाल्यास रद्द समजावा.

३. खर्चाची पुर्तता पुढील तारखेस किंवा तत्पुर्वी करावी.

४. दोन्ही पक्षांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Digitally signed by AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Date: 2024.12.09 18:02:59 +0530

दि.०९/१२/२०२४ **(अ.त्रिं. मनगिरे)**

जयसिंगपूर. २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),

जयसिंगपूर.

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Shri.R.L.Mane. |
| Name of Court | 2nd Jt.C.J.J.D.& J.M.F.C., Jaysingpur. |
| Date of Dictation. | 09/12/2024. |
| Judgment/order signed by the PO on | 09/12/2024. |
| Judgment/order uploaded on | 09/12/2024. |